# मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प

## प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष

शेती महामंडळ भवन, २७०,भाबुर्डा ,सेनापती बापट मार्ग ,पुणे -१६
संकेतस्थळ : www.smart-mh.org , दूरध्वनी ०२०-२५६५६५७७/२५६५६५७८

जा. क्र. प्र.स.व.व्य.क/स्मार्ट/संपादन/कृषि/४९७ /२०२३ दि. २० / ०३ /२०२३

प्रती,
मा. प्रमुख,
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषि तथा
कृषि संचालक (आत्मा), पुणे.

विषय- मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत जॅकफ्रुट किंग ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली. झापडे ता. लांजा, जिल्हा- रत्नागिरी यांचे मंजूर उपप्रकल्पातील Construction of Processing Unit Shed संपादन करण्याकरिता पुरवठादार निवडीकरिता प्रसिद्ध करायच्या निविदा दस्तऐवजास पूर्व मान्यता देण्याबाबत

संदर्भ -

१. उप प्रकल्प मंजूरी आदेश पत्र क्र/कृआ/आत्मा/स्मार्ट/मु.उ.म.आ/३३७/२०२२ दि.२०/०९/२०२२
२. संपादन मार्गदर्शक सूचना जा.क्र. पीसीएमायू /स.आ.सं. (CBO) /सं.मा.सु./१२७१/२०२२ दि.२९/८/२२
३. स्मार्ट/पीसीएमायू /प्र.अ.क./संपादन/ ४७/२०२२-२३ दि.११/०१/२०२३
४. प्र.अ. कक्ष-कृषि स्मार्ट/CBO/निविदा दस्तएवज पूर्व मान्यता/१३०५/२०२३ दि. १५/०३/२०२३

उपरोक्तसंदर्भियपत्र क्र ४ अन्वये प्रकल्प अमलबजावणी कक्ष-कृषि यांनी जॅकफ्रुट किंग ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली. झापडे ता. लांजा, जिल्हा- रत्नागिरी यांचे मंजूर उपप्रकल्पातील Construction of Processing Unit Shed च्या बांधकामाकरीता ठेकेदार निवडी करिता प्रसिद्ध करायच्या निविदा दस्तऐवजास पूर्व मान्यता देण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे.

प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षाने सदरच्या निविदा दस्तऐवजाची तपासणी केली असून निविदा दस्तऐवज जॅकफ्रुट किंग ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली. झापडे ता. लांजा, जिल्हा- रत्नागिरी यांच्या स्तरावर प्रसिद्ध करण्यास खालील अटी शर्ती व संदर्भ क्र. १ च्या आधीन राहून मान्यता देण्यात येत आहे .

१. निविदा प्रक्रिया संदर्भ क्र. २ च्या संपादन मार्गदर्शक सूचना नुसार करण्यात यावी.
२. निविदा जाहिरात राज्यस्तरीय वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात यावी.
३. सोबत जोडण्यात आलेल्या मंजूर निविदा दस्तऐवज (W२) योग्य माहिती भरून स्मार्ट प्रकल्पाच्या https://www.smart-mh.org या संकेतस्थळावर निविदादस्तऐवज प्रसिद्ध करण्यात यावा.
४. निविदा जाहिरात वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून निविदा सादर करण्यास निविदाधारकांना कमीत कमी ३० दिवसाचा कालावधी देण्यात यावा.
५. जर निविदा सादर करण्याच्या मुदतीत वाढ करण्यात आली तसेच निविदा दस्तऐवज मधील काही अटी शर्ती मध्ये काही बदल करण्यात आल्यास त्याबाबतचे शुद्धीपत्रक प्रकल्पाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावे.
६. निविदा प्रसिद्ध झाल्यानंतर खालील संपादन प्रक्रियेस आपल्या शिफारसीसह पूर्व मान्यतेकरीता प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षास सादर करण्यात यावे.
    १) तांत्रिक मूल्यमापन अहवाल
    २) आर्थिक मूल्यमापन अहवाल , कार्यारंभ आदेश व कराराचे प्रारूप

वरील अटी व शर्तीस अधीन राहून जॅकफ्रुट किंग ॲग्रो प्रोड्युसर कंपनी ली. झापडे ता. लांजा, जिल्हा- रत्नागिरी या संस्थेने पुढील संपादन प्रक्रिया करण्यात यावी.

सोबत : मंजूर निविदा दस्तऐवज

अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट